मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# ‘स्वच्छ सर्वेक्षण 2024’ मध्ये शहराला अव्वल आणण्यासाठी अभिप्राय नोंदवा ; महापालिकेचे आवाहन

## ‘स्वच्छ सर्वेक्षण 2024’ ही स्पर्धा देशभरातून घेतली जात आहे : पिंपरी-चिंचवड महानगरपालिका या स्पर्धेत सामील झाली आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

‘स्वच्छ सर्वेक्षण २०२४’ स्पर्धेत पिंपरी-चिंचवड शहराला अव्वल स्थान मिळवून देण्यासाठी स्वच्छतेच्या बाबतीत नागरिकांचा अभिप्राय अत्यंत महत्वाचा आहे. त्यामुळे शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी स्वच्छ सर्व्हेक्षणात अभिप्राय नोंदवावा, असे आवाहन महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.

‘स्वच्छ सर्वेक्षण २०२४’ ही स्पर्धा देशभरातून घेतली जात आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका या स्पर्धेत सामील झाली आहे. या स्पर्धेसाठी नागरिकांचे अभिप्राय महत्वाचे असून त्यास अतिरिक्त गुण देण्यात आले आहेत. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेस देशात अव्वल स्थान मिळवून देण्यासाठी पिंपरी-चिंचवड शहरातील प्रत्येक नागरिकाने आपला स्वच्छतेविषयक अभिप्राय



देणे महत्त्वाचे आहे.

दरम्यान, ‘स्वच्छ सर्वेक्षण २०२४’ च्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने जोरदार तयारी केली आहे. आरोग्य विभागाकडून घराघरातील कचरा संकलित करून त्यावर पुढील योग्य ती प्रक्रिया केली जात आहे. नागरिकांमध्ये ओला, सुका कचरा विलगीकरण, होम कम्पोस्टिंग, कापडी पिशव्यांचा वापर या विषयी जनजागृती करण्यासाठी आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उप आयुक्त सचिन पवार यांच्या मार्गदर्शनासाठी आरोग्य विभागाकडून विविध उपक्रम देखील राबवण्यात येत आहेत.

### असा नोंदविता येणार अभिप्राय

- » सर्वात प्रथम नागरिकांनी https://sbmurban.org/feedback या संकेतस्थळावर जा.
- » त्यानंतर स्वतःचा मोबाईल क्रमांक टाका आणि पसंतीची भाषा निवडा.
- » ‘राज्य’ या पर्यायात ‘महाराष्ट्र’ आणि ‘जिल्हा’ या पर्यायात ‘पुणे’ निवडा
- » युएलबी पर्यायात ‘पिंपरी चिंचवड’ निवडा
- » त्यानंतर तुमच्या समोर येणाऱ्या प्रश्नांचे योग्य उत्तर द्या

“ तुमच्या मोबाईलवर येणारा ओटीपी टाकून अर्ज सबमिट करा ‘स्वच्छ सर्वेक्षण २०२४’ या स्पर्धेत आपल्या पिंपरी-चिंचवड शहराला देशात अव्वल स्थान मिळवून देण्यासाठी नागरिकांनी अधिकाधिक प्रमाणात स्वच्छतेविषयक अभिप्राय नोंदवण्याची गरज आहे. हा अभिप्राय ऑनलाइन नोंदवता येत असून ही प्रक्रियाही सोपी आहे. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी अभिप्राय नोंदवावा,

**- विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

# उष्णतेच्या लाटेपासून बचावासाठी उपाययोजना करण्याचे पिंपरी महापालिकेचे नागरिकांना आवाहन

## पिंपरी चिंचवड शहरातील तापमानात सतत वाढ होत असून उष्णतेच्या लाटेमुळे शारीरिक ताण येण्याची आणि गंभीर आजार होण्याची शक्यता आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील तापमानात सतत वाढ होत असून उष्णतेच्या लाटेमुळे शारीरिक ताण येण्याची आणि गंभीर आजार होण्याची शक्यता आहे. नागरिकांनी आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक खबरदारी घेऊन संभाव्य धोक्यांपासून स्वतःचे आणि आपल्या कुटुंबियांचे संरक्षण करावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना करण्यात येत आहे. उष्णतेपासून बचावासाठी खालील उपाययोजना कराव्यात, काय करावे व काय करू नये. उष्णतेच्या लाटेमुळे शारिरीक ताण पडून गंभीर आजारी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे होणारे परिणाम टाळण्यासाठी खालील उपाययोजना कराव्यात.




**काय करावे..**

१) तहान लागलेली नसली तरी सुध्दा जास्तीत जास्त पाणी पिण्यात यावे.

२) हलके, पातळ व सछिद्र सुती कपडे वापरावेत.

३) बाहेर जाताना गॉगल, छत्री,टोपी, बुट व चपलांचा वापर करावा.

४) प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत ठेवावी.

५) उन्हात काम करीत असलेल्या व्यक्तींनी डोक्यावर टोपी किंवा छत्रीचा वापर करावा तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकावे.

६) शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओ.आर.एस, घरी बनविण्यात आलेली लस्सी, लिंबू-पाणी, ताक इत्यादीचा नियमित वापर करावा.

७) अशक्तपणा, स्थुलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा चटका बसण्याची चिन्हे ओळखावीत. चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा.

८) पाळीव प्राण्यांना पुरेसे पिण्याचे पाणी द्यावे व सावलीत ठेवावे.

९) घरातील वातावरण थंड ठेवण्यासाठी पंखे, कुलर, वाळयाचे पडदे व सनशेडचा वापर करण्यात यावा. रात्री खिडक्या उघडया ठेवण्यात याव्या.

१०) थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करावे.

११) कामाच्या ठिकाणी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी

१२) सुर्य प्रकाशाचा थेट संबंध टाळण्यासाठी कामगारांना सुचित करण्यात यावे.

१३) पहाटेच्या वेळी जास्तीत जास्त कामाचा निपटारा करावा.

१४) बाहेर कामकाज करीत असताना अधूनमधून ब्रेक घेउन आराम करावा.

१५) लहान मुले, गरोदर महिला, वृद्ध व आजारी व्यक्तींची अधिकची काळजी घेण्यात यावी.

१६) रस्त्यांच्या कडेला उन्हापासून संरक्षणाकरीता सावलीचा आधार घ्यावा.

१७) आवश्यक तेवढाच व्यायाम करावा, अतिश्रम टाळावे.

**काय करू नये..**

१) लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेउ नये.

२) दुपारी १२.०० ते ०४.०० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे.

३) गडद रंगाचे, घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे.

४) बाहेर तापमान अधिक असल्यास शारीरीक श्रमाची कामे टाळावित, दुपारी १२.०० ते ०४.०० या कालावधीत बाहेर काम करणे टाळावे.

५) उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळण्यात यावे. तसेच मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवण्यात यावी.

नागरिकांनी उष्णतेपासून बचाव करण्यासाठी वरील उपाययोजना कराव्यात असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# कर्कश सायलेन्सरवर वाहतूक पोलिसांकडून ‘बुलडोझर’

## वाहतूक शाखेच्या कार्यालयात 1768 सायलेन्सर नष्ट, पोलिसंनी शहरातील वेगवेगळ्या भागात बुलेटचालकांविरुद्ध कारवाई करून त्यांचे सायलेन्सर जप्त केले होते.

**पुणे | प्रतिनिधी**

शहर वाहतूक शाखेच्या वतीने कर्णकर्कश आवाज करणारे सायलेन्सर बसविणाऱ्या बुलेट राजांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे. ऐन होळी आणि धूलीवंदनाचा मुहूर्त साधात पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली मॉडिफाईड सायलेन्सरवर ‘सर्जिकल स्ट्राईक’ करण्यात आला. या विशेष मोहिमेअंतर्गत १७६८ मॉडिफाईड सायलेन्सरवर बुलडोझर फिरविण्यात आला आहे.



फटाक्यांसारखा आवाज काढणारे कर्कश सायलेन्सरचा वापर करणाऱ्या बुलेटचालकांविरुद्ध वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. वाहतूक पोलिसांनी शहराच्या वेगवेगळ्या भागात बुलेटचालकांविरुद्ध कारवाई करुन फटाक्यासारखे आवाज काढणारे सायलेन्सर जप्त केले. येरवड्यातील वाहतूक शाखेच्या कार्यालयात जप्त केलेल्या एक हजार ७६८ सायलेन्सरवर बुलडोझर चालविण्यात आला. पोलिसांच्या कारवाईचे नागरिकांनी कौतूक केले आहे.

रात्री अपरात्री शहर,तसेच उपनगरात भरधाव वेगाने बुलेटचालक तरूण जातात. बूलेटच्या सायलेन्सरमध्ये फेरफार (मॉडिफाय) करण्यात आल्याने त्यातून फटाक्यासारखा आवाज निघतो. फटाक्यासारख्या आवाजामुळे ज्येष्ठ नागरिकांना त्रास होत असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. गेल्या पंधरा ते वीस दिवसांपासून पोलिसांनी शहरातील वेगवेगळ्या भागात बुलेटचालकांविरुद्ध कारवाई करुन त्यांचे सायलेन्सर जप्त केले होते. कर्कश सायलेन्सर नष्ट करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी दिले होते.

या कर्कश आवाजाने जेष्ठ नागरिक, महिला, शांतताप्रिय नागरिकांना त्रास होत होता. याबाबतच्या अनेक तक्रारी नागरिंकाकडुन प्राप्त झाल्याने अशा बेकायदेशीर सायलेन्सर बसविलेल्या दुचाकी वाहनांवर कठोर कारवाई करण्याबाबतच्या सूचना पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिल्या होत्या. त्यानुसार, वाहतूक शाखेचे उपायुक्त अमोल झेंडे यांनी विशेष मोहीम हाती घेतली. वाहतूक शाखेच्या सर्व विभागांना तशा सूचना देण्यात आल्या. तसेच, बुलेट सायलेन्सर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात सुरुवात करण्यात आली. यापुढे अशा प्रकारचे सायलेन्सर विक्री करणाऱ्या व बसविणाऱ्या गॅरेज मालिकांवरही कारवाई करण्यात येणार असल्याचे उपायुक्त झेंडे यांनी सांगितले.

त्यानंतर पोलिसांनी जप्त केलेल्या एक हजार ७६८ सायलेन्सरवर ‘बुलडोझर’ चालवून नष्ट केले. या वेळी अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे, पोलीस निरीक्षक सुनील गवळी आणि वाहतूक शाखेतील अधिकारी उपस्थित होते. फटाक्यासारखा आवाज काढणारे, तसेच चित्रविचित्र आवाज काढणारे सायलेन्सर बसविल्यास पोलिसांकडून जप्त करण्यात येणार आहे. अशा प्रकारच्या सायलेन्सरचा वापर करणाऱ्या दुचाकीस्वार, बुलेट चालकांविरुद्ध यापुढील काळात तीव्र कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी दिला आहे.

### विक्रेते, गॅरेजचालकांविरुद्ध कारवाई

» कर्कश सायलेन्सरचा वापर करणारे वाहनचालक, तसेच सायलेन्सर विक्री करणारे व्यावसायिक, तसेच सायलेन्सर बसवून देणारे गॅरेजचालकांविरुद्ध कारवाई करण्यात येणार आहे. यापुढील काळात ही कारवाई तीव्र करण्यात येणार असल्याचा इशारा वाहतूक शाखेचे उपायुक्त अमोल झेंडे यांनी दिला आहे.

# पुण्यात भोई प्रतिष्ठानकडून विशेष मुलांसाठी धुलवड साजरी; मुरलीधर मोहोळ यांचाही सहभाग

## विशेष मुलांसाठी ‘रंग बरसे’ चे आयोजन करण्यात आलं, या कार्यक्रमात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी देखील सहभाग घेत भोई प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे कौतुक केले

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यात भोई प्रतिष्ठानकडून विशेष मुलांसाठी ‘रंग बरसे‘ चे आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यक्रमात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनीदेखील सहभाग घेत भोई प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे कौतुक केले. महाराष्ट्रात होळी आणि धुलिवंदनाचा मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. राज्यात ठिकठिकाणी नागरिक धुलिवंदनाचा आनंद लुटताना दिसत आहेत. होलिका दहनानंतर आज दुसऱ्या दिवशी राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये धुळवड साजरी केली जाते.



दरम्यान, पुण्यात भोई प्रतिष्ठानकडून विशेष मुलांसाठी ‘रंग बरसे‘ चे आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यक्रमात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनीदेखील सहभाग घेत भोई प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

विशेष मुलांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करण्यासाठी गेली तीस वर्ष झाले पुण्यात भोई प्रतिष्ठानकडून हा अभिनव उपक्रम राबवण्यात येत आहे. यामध्ये अनाथ, एचआयव्ही बाधित, मतिमंद, दिव्यांग, रेल्वे फलटावर बूट पॉलिश करणारे, देवदासी भगिनींची मुलं, डोंबाऱ्याचा खेळ करणाऱ्या मुलांचाही सहभाग असतो.

मी दरवर्षी या सोहळ्याला उपस्थिती लावतो. आमच्या शहराचे एक वैशिष्ट्य आहे याच्यामध्ये एक समता आहे विश्वबंधुत्व आहे. त्यामुळे सर्वांना मनापासून मी आजच्या या उत्सवाच्या शुभेच्छा देतो आणि विशेष करून डॉक्टर मिलिंद भोई आणि त्यांच्या सर्व टीम कौतुक केलं पाहिजे. पण समाजात ज्यांना कोणी त्यांच्यासोबत हा उत्सव साजरा करण्याचा प्रयत्न भोई करतात आणि आम्हालादेखील संधी देतात. त्यासाठी त्यांचे आभार. अशा शब्दात मंत्री मोहोळ यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

### भोई प्रतिष्ठानच्या उपक्रमाचे कौतुक

» पुण्यामध्ये अशा उत्सवांमधून एक सामाजिक भाव जपला जातो. संवेदनशीलपणाने असे उत्सव साजरे गेले जातात. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे, माझे मित्र डॉक्टर मिलिंद भोई आणि त्यांच्या सर्व टीम च्या माध्यमातून विशेष मुलांसाठी त्याच्यात अनेक प्रकारची मुलं येतात. अशा विशेष मुलांच्या सोबत ज्यांचे आयुष्यामध्ये खऱ्या अर्थाने सण उत्सव हा नसतो किंबहुना त्यांना साजरा करता येत नाही नशिबाने त्यांच्यावरती ही परिस्थिती असते. पण भोई प्रतिष्ठान गेली तीस वर्षे झाले त्यांच्यासोबत अनेक उत्सव साजरं करत आहे मी दरवर्षी या सोहळ्याला उपस्थिती लावतो. आमच्या शहराचे एक वैशिष्ट्य आहे याच्यामध्ये एक समता आहे विश्वबंधुत्व आहे. त्यामुळे सर्वांना मनापासून मी आजच्या या उत्सवाच्या शुभेच्छा देतो आणि विशेष करून डॉक्टर मिलिंद भोई आणि त्यांच्या सर्व टीम कौतुक केलं पाहिजे. पण समाजात ज्यांना कोणी त्यांच्यासोबत हा उत्सव साजरा करण्याचा प्रयत्न भोई करतात आणि आम्हालादेखील संधी देतात. त्यासाठी त्यांचे आभार. अशा शब्दात मंत्री मोहोळ यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

# नगरसेवकांच्या मानधन, भत्यांचे 8 कोटी वाचले

## नगरसेवक नसल्याने सद्यस्थितीत महापालिकेचा सर्व कारभार आयुक्त तथा प्रशासक पाहत आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेची निवडणूक मुदतीत झाली नसल्याने १४ मार्च २०२२ मध्ये महापालिकेमध्ये प्रशासकीय राजवट सुरू झाली. नगरसेवक नसल्याने सद्यस्थितीत महापालिकेचा सर्व कारभार आयुक्त तथा प्रशासक पाहत आहेत. महापालिकेत नगरसेवक नसल्याने शहरामध्ये फायदा-तोटा याच्या चर्चा सुरू आहेत. नगरसेवक नसल्याने नागरिकांची अडचण होत असली तरी यामुळे महापालिकेचा फायदाच झाला आहे. मुदत संपल्याने नगरसेवकांना देय असलेले कोट्यवधी रुपये वाचत आहेत.

प्रभागरचनेचा घोळ, ओबीसी आरक्षण त्यानंतर पुन्हा राज्यातील सत्ताबदल यामुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर गेल्या आहेत. त्यामुळे पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये मार्च २०२२ पासून प्रशासकीय राजवट आहे.




### निवडणुका घेण्याची तीव्र इच्छा

» नगरसेवक नसल्याने महापालिकेचा मानधन व भत्त्यांवरील खर्च वाचत असला तरी नागरिकांसाठी लोकप्रतिनिधी महत्वाचे आहे. नागरिकांना त्यांच्या समस्या मांडण्यासाठी नगरसेवक हक्काचे व्यासपीठ असतात. तसेच त्या समस्या सोडवण्यासाठी नगरसेवक प्रयत्न करत असतात. त्यामुळे नागरिकांसह राजकीयांचीही निवडणूक लवकर व्हावी, अशी इच्छा आहे.

नगरसेवकांना त्यांच्या कामासाठी पंधरा हजार रुपयांचे मानधन दिले जाते. तसेच महापालिका सभा, स्थायी समिती सभा यांचे भत्ते असतात. तर पदाधिकाऱ्यांच्या दिमतीसाठी मोटारी असतात त्यांच्या इंधनभत्त्यासाठी खर्च होत असतो. त्याचप्रमाणे पदाधिकाऱ्यांना दालन दिल्यास त्यासाठी कर्मचारी वर्ग, पाणी, वीज असा अस्थापना खर्चही असतो. दालन बंद असल्याने हा खर्च देखील वाचला आहे.

नगरसेवकांना दर महिन्याला पंधरा हजार रुपये मानधन दिले जात होते. निवडून आलेले १२३, तर पाच स्वीकृत नगरसेवक अशा एकूण १२८ नगरसेवकांना मानधन दिले जात होते. याप्रमाणे मानधनाचा सरासरी विचार केल्यास १९ लाख २० हजार रुपये दर महा खर्च होत असतो. तीन वर्षांच्या प्रशासकीय राजवटीचा विचार केला, तर ६ कोटी ९१ लाख २० हजार रुपये इतकी मानधनाची रक्कम वाचली आहे.

### दालन बंद असल्याने खर्च वाचला

» महापालिकेत महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती तसेच सर्व सभापतींना दालन दिले जाते. सद्यस्थितीत प्रशासकीय राजवट सुरू असल्याने महापौर, उपमहापौर तसेच स्थायी समिती सभापती यांचे केबिन बंद आहे. तसेच सभागृह नेता आणि विरोधी पक्षनेता ही दोन पदे मान्य आहेत. त्यांनाही केबिन दिले जाते. त्याचप्रमाणे पक्षांच्या गटनेत्यांनाही केबिन दिले जाते. त्यांना लिपिक आणि शिपाई दिले जातात. सध्या केबिन बंद असल्याने तेथील कर्मचारी दुसऱ्या ठिकाणी कामास लावले आहेत. तर तेथील वीज, चहा-पाणी याचा खर्च वाचत आहे..

### सभापतीला 30 हजार रुपये इंधन भत्ता

» प्रत्येक प्रभाग समितीच्या आणि विषय समितीच्या सभापतीला महापालिकेची मोटार न वापरता स्वतःची मोटार वापरल्यास ३० हजार रुपये इंधन भत्ता दिला जातो, तर १४ विविध विषय समितच्यांच्या सभापतींसाठी दरमहा ४ लाख २० हजार रुपये इंधन भत्यासाठी खर्च होत होते. तर तीन वर्षात १ कोटी ५१ लाख २० हजार रुपयांची बचत झाली आहे.

# पुणे ते लोणावळा रेल्वे मार्गाला तिसरी आणि चौथी मार्गिका कधी मिळणार?

## पुणे-लोणावळा लोकल सेवेला 47 वर्ष पूर्ण; प्रवाशांच्या मागण्या प्रलंबित

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे लोणावळा दरम्यान सुरू असलेल्या उपनगरीय रेल्वे सेवेला मंगळवारी (दि. १२) ४७ वर्ष पूर्ण झाली आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून पुणे ते लोणावळा रेल्वे मार्गाला तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेची प्रतिक्षा आहे. प्रवाशांची ही मागणी कधी पूर्ण होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सध्या पुणे लोणावळा लोकलच्या दिवसभरात ६०.५९ किलोमीटर अंतर कापत दररोज लाखो प्रवाशांची ने-आण करीत ४४ फेऱ्या होतात. मागील 46 वर्षात एकदाही पुण्याला नवीन फ्रेश फॅक्टरी आऊट ईएमयु लोकल रेक मिळाला नाही. मुंबई उपनगरात वापरून पुण्याला दिलेल्या जुन्या लोकल रेक मधूनच पुणे- लोणावळा दरम्यान लोकलचा प्रवास होत आहे.

करोनानंतर लोकलच्या फेऱ्या कमी झाल्या. शिवाजीनगरला लोकलसाठी विशेष प्लॅटफार्म तयार करुन येथून तळेगाव आणि लोणावळासाठी चौदा लोकल धावतात. नोव्हेंबर २०२३ मध्ये स्वयंचलित सिंग्नल यंत्रणेचे काम पूर्ण झाले. त्यामुळे रेल्वे गाड्या अचूक वेळेत धावून प्रवासाच्या वेळेत बचत झाली.



### पुणे-लोणावळा दरम्यान रेल्वे स्थानके

» पुणे, शिवाजीनगर, खडकी, दापोडी, कासारवाडी, पिंपरी, चिंचवड, आकुर्डी, देहूरोड, बेगडेवाडी, घोरावाडी, तळेगाव, वडगाव, कान्हे, कामशेत, मळवली, लोणावळा अशी ६०.५९ किलोमीटर अंतरावर १७ स्थानके आहेत. त्यातील शिवाजीनगर, खडकी, चिंचवड, देहूरोड, तळेगाव, मळवली या स्थानकांवर रेल्वे पासिंगसाठी सुविधा देण्यात आली आहे.

### प्रवाशांच्या प्रमुख मागण्या

- » तिसरी आणि चौथी मार्गिका लवकर सुरु करणे
- » पीक अवर मध्ये फास्ट लोकल सुरु करणे
- » मेधा किंवा बमबार्डियार (अलस्टॉम) पद्धतीचे रेक द्यावेत
- » लोकल फेऱ्या वाढवाव्यात
- » दुपारच्या वेळी लोकल फेऱ्या सुरु कराव्यात
- » मुंबई प्रमाणे पुणे-लोणावळा दरम्यानचा १५ डब्याच्या लोकल सुरु कराव्यात

“ पुणे लोणावाळा स्वयंचलित सिग्नल यंत्रणा पुर्ण झाल्याने दोन गाड्यांमधील अंतर कमी झाले आहे. याचा फायदा लोकलच्या प्रवाशांना मिळावा. गर्दीच्या वेळेत लोकलच्या फेऱ्या वाढवण्यात याव्या. तसेच मार्गावरील ताण कमी करण्यासाठी रेल्वेने लवकरात लवकर पुणे लोणावळा तिसऱ्या व चौथ्या लाईनचे काम सुरु करणे आवश्यक आहे.

**- ईक्बाल मुलाणी, माजी अध्यक्ष, पिंपरी चिंचवड रेल्वे प्रवाशी संघटना**

# पुण्यात तब्बल 7 हजार कोटींची गुंतवणूक!

## यासाठीचे 172 करार करण्यात आले, यात 50 लाख ते 1 हजार 500 कोटी रुपयांपर्यंतच्या गुंतवणूक करारांचा समावेश आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यात ७ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक होणार असून, यासाठीचे १७२ करार बुधवारी करण्यात आले. यात ५० लाख ते १ हजार ५०० कोटी रुपयांपर्यंतच्या गुंतवणूक करारांचा समावेश आहे. या गुंतवणुकीमुळे ५० हजार प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहेत.

औद्योगिक संघटना, सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम, मोठे उद्योजक, बँकर्स यांच्या औद्योगिक गुंतवणूक परिषदेत हे करार करण्यात आले. या वेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे विभागाचे उद्योग सहसंचालक शैलेश राजपूत, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रिज अँड अॅग्रीकल्चरचे (एमसीसीआयए) महासंचालक प्रशांत गिरबने, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे कार्यकारी संचालक विक्रांत बगाडे, जिल्हा उद्योग केंद्राच्या सरव्यवस्थापिका अर्चना कोठारी आदी उपस्थित होते. याप्रसंगी काही प्रमुख गुंतवणूकदारांचा प्रातिनिधिक स्वरुपात सत्कार करण्यात आला.



### ‘समृद्धी’च्या धर्तीवर पुरंदर विमानतळासाठी भूसंपादन

» जिल्ह्यात विकसित होत असलेला बाह्य वर्तुळाकार मार्ग तसेच अन्य सुविधांमुळे बाह्य क्षेत्रातही उद्योग विकासाला चालना मिळणार आहे. पुरंदर येथील विमानतळाच्या अनुषंगाने अधिसूचना निघताच तत्काळ समृद्धी महामार्ग तसेच पुणे बाह्य वर्तुळाकार मार्गाच्या धर्तीवर जलद भूसंपादन करण्यात येईल. त्याशिवाय पुणे विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणाच्या कामालाही लवकरच गती मिळणार आहे. पुणे शहरातील एकात्मिक वाहतूक आराखडा तयार करण्यात आला असून, अशा प्रकारे बाह्य व अंतर्गत वाहतूक कोंडीवर गतीने मार्ग काढण्याच्या उपाययोजना सुरू आहेत, असे विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांनी सांगितले.

या वेळी बोलताना विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार म्हणाले की, पुणे विभागात उद्योगांच्या पायाभूत सुविधांच्या अडचणी, असामाजिक तत्त्वांकडून येणारे अडथळे या अनुषंगाने उद्योगांशी संवाद साधण्यासाठी प्रशासन कायम उपलब्ध असून, दर तीन महिन्यांनी उद्योगांसोबत आढावा घेण्यात येईल.

प्रशांत गिरबने म्हणाले, ‘देशाच्या एकूण निर्यातीत पुणे जिल्हा हा पहिल्या पाच जिल्ह्यांमध्ये समाविष्ट असून, अभियांत्रिकी निर्यातीमध्ये प्रथम क्रमांकावर आहे. राज्यात येणाऱ्या परकीय गुंतवणुकीतही पुणे जिल्ह्याचा मोठा वाटा आहे. चेंबर तसेच सदस्य उद्योगांच्या वतीने इलेक्ट्रॉनिक वाहने धोरण तसेच नवीन औद्योगिक धोरणासाठी उपयुक्त सूचना देण्यात येतील. जिल्ह्यात येणाऱ्या गुंतवणूकदारांना विश्वास वाटेल असे वातावरण तयार करण्यासाठी एकत्रित प्रयत्न करूया.’

### पुढील महिन्यात अॅग्री हॅकॅथॉन

» पुढील महिन्यात प्रशासन देशात पहिल्यांदाच नावीन्यपूर्ण अशी पुणे अॅग्री हॅकॅथॉन आयोजित करण्यात येणार असून, यासंदर्भात देशात कृषीमध्ये होत असलेले नवीन संशोधन, अत्याधुनिक तंत्रज्ञान निर्माण करत असलेल्या मोठ्या उद्योगांसोबतच नवकल्पनांच्या माध्यमातून नवउद्यम (स्टार्टअप) स्थापन करणाऱ्यांनाही बोलावण्यात येणार आहे. या सर्वांना त्यांचे तंत्रज्ञान दाखविण्याची संधी मिळणार असून, ते प्रत्यक्ष शेतीपर्यंत कसे जाईल यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

> “जिल्ह्यामध्ये अधिकाधिक औद्योगिक गुंतवणूक व विकास व्हावा यासाठी उद्योगस्नेही धोरण राबविण्यात येत आहे. उद्योगांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यालाही प्रशासनाचे उच्च प्राधान्य असून, कोणत्याही घटकाकडून त्रास होत असल्यास उद्योगांनी खुलेपणाने, निर्भिडपणे त्याची माहिती द्यावी.
>
> - डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, विभागीय आयुक्त

# उत्पादकांना चिंच ठरली गोड, तुरट; यंदा मिळतोय बरा बाजारभाव

## चिंच झोडणीच्या कामामुळे परिसरातील ग्रामीण भागातील महिला मजुरांच्या हाताला काम

**पुणे | प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून दिवसेंदिवस उन्हाचा चटका वाढला असल्याने वाल्हे (ता. पुरंदर) परिसरात चिंच झोडणीचे काम जोरदार सुरू आहे. चिंच झोडणीच्या कामामुळे परिसरातील ग्रामीण भागातील महिला मजुरांच्या हाताला काम मिळत असून त्यांना पाच किलो चिंच फोडणीसाठी 50 रुपये मिळत आहे. तर यंदा भाव जरा बरा मिळत असल्याने उत्पादकांना चिंच ही गोड, तुरट ठरली आहे.



ग्रामीण भागातील महिलांना चिंच फोडणी करण्यासाठी घरपोच चिंच दिली जात असल्याने अनेक महिला घरातील कामे करीत चिंच फोडणी करून कुटुंबाला आर्थिक हातभार लावत आहेत. एक महिला दिवसातून 25 ते 40 किलो चिंच फोडणी करते. त्यामुळे त्यांना 250 ते 400 रुपये पर्यंत रोजंदारी पडते.

यावर्षी पुरंदर तालुक्यातील अनेक गावांत पाणीटंचाई निर्माण होत असून पाणीटंचाई असल्याने शेतीचे कामे नसल्याने शेतमजूर महिलावर्ग आर्थिक संकटात आहेत. अशातच चिंच फोडणीच्या कामाने महिलांच्या हाताला काम मिळून चार पैशांचा आधार मिळत आहे. पावसाळ्यामध्ये चिंचेच्या झाडांना आलेली फुले पाहून झाडाची किंमत आगोदर ठरविली जाते. चिंच खरेदी करणाऱ्यांत लहान व्यापाऱ्यांची संख्या मोठी आहे. दोन-चार झाडे घेणारे व्यापारी चिंचा फोडून गावातील मोठ्या व्यापाऱ्यांना विकतात. मोठे व्यापारी सुपा (ता. बारामती) किंवा अहमदनगर येथे फोडलेल्या चिंचा व चिंचोके विकतात.

### चार महिने रोजगार...

» चिंचा झोडण्याचे काम फेब्रुवारीमध्ये सुरू होते.ते मे महिन्यापर्यंत संपते. या चार महिन्यांत ग्रामीण भागात मोठी रोजगार निर्मिती होते. शेतीच्या कामांनाही मजुरांची टंचाई भासते. झाडावर चढून बांबूने झोडपून चिंचा खाली पाडणे, जमिनीवर पडलेल्या चिंचा वेचणे, त्यांच्यावरील टरफल बाजूला करणे, चिंचा फोडून गर व चिंचोके वेगळे करणे यासाठी मजूर मोठ्या प्रमाणात लागतात. चिंचा झोडपण्यासाठीच जास्त प्रमाणात मजूर लागतात. त्यांना प्रति दिन 500 रुपये मिळतात. तसेच उचल म्हणून आगोदर पैसे दिले जातात.चिंचा वेचणाऱ्या महिलांना 250 रुपये प्रति दिन मजुरी मिळते. टरफल बाजूला केल्यानंतर चिंचा फोडतात.चिंचेपासून साधारणतः 55 टक्के गर, 14 टक्के चिंचोके व 11 टक्के टरफल व शिरांचे उत्पादन मिळते.

झाडाचा विस्तार, लागलेली फळे-फुले, बहराचे प्रमाण पाहून व्यापारी दर ठरवतात. उत्पादनाचे चांगले वर्षे असेल, तर चांगल्या झाडाला साधारणतः चार हजार रुपयांचा दर ठरतो. फेब्रुवारी ते एप्रिल हा विक्री हंगाम असतो. जून- जुलै महिन्यांत फुले चांगली फुललेली असतात. चिंचा किती लगडणार याचा अंदाज येतो. काही व्यापारी फुले असताना तर काही व्यापारी लहान फळे लागल्यानंतर सौदा (व्यवहार) ठरवतात. ज्या शेतकऱ्यांना आर्थिक नड आहे ते पुढील दोन-तीन वर्षांचाही सौदा (व्यवहार) निश्चित करतात. मात्र, यात कमी पैसे मिळण्याची शक्यता असते.